झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

क्र. झोपुप्रा/ आयटी/ कार्या-३/ टेबल-५/२५२/ २०२३

दिनांक: 01 AUG 2023

# परिपत्रक - २०९

**विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील PAP आणि PTC संदर्भातील माहिती शासनाच्या MAHA RERA आणि नोंदणी व मुद्रांक विभागास पाठविण्याबाबत...**

सर्व विभागप्रमुखांना कळविण्यात येते की, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये झोपुप्रा योजना विकासकाकडून सादर केली जाते. प्राधिकरणाकडून विकासकाला योजना राबविण्यसाठी आशयपत्र (L.O.I), स्वीकृती सूचना (I.O.A), बांधकाम परवानगी (C.C.), पुढील पुर्णत्व प्रमाणपत्र (F.C.C), भाग भोगवटा प्रमाणपत्र (Part O.C), व भोगवटा (O.C) प्रमाणपत्र देण्यात येते. विकासकाला पुढील आशयपत्र (L.O.I), स्वीकृती सूचना (I.O.A), बांधकाम परवानगी (C.C.), पुढील पुर्णत्व प्रमाणपत्र (F.C.C), भाग भोगवटा प्रमाणपत्र (Part O.C), व भोगवटा (O.C) प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर विकासकाने प्राधिकरणास प्रमाणपत्रानुसार कोणत्या Wing किंवा बिल्डींग मध्ये किती PAP आणि PTC उपलब्ध आहे हि माहिती योजनेमधील नकाशांवर चिन्हांकित करुन सादर करणे बंधनकारक आहे.

वरीलप्रमाणे प्राधिकरणास विकासकाकडून प्राप्त PAP आणि PTC ह्यांची होणाऱ्या परस्पर विक्रीवर आळा घालण्यासाठी विकासकाकडून प्राप्त झालेल्या प्रमाणपत्रानुसार कोणत्या Wing किंवा बिल्डींग मध्ये किती PAP आणि PTC उपलब्ध आहे, याबाबतची माहिती संबंधित कार्यकारी अभियंता यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील संबधित महाराष्ट्र शासनाच्या MAHA RERA आणि नोंदणी मुद्रांक विभागाला आपल्यास्तरावरुन त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरिता प्राधिकरणाच्या **headclerk@sra.gov.in** या ई-मेलद्वारे पाठविण्यात यावी, जेणेकरुन नोंदणी मुद्रांक विभाग असे PAP व PTC यांची नोंदणी करतेवेळीस सत्यता पडताळणी करणे शक्य होईल.

तसेच संबंधित कार्यकारी अभियंता यांनी योजनेच्या ठिकाणी PAP, PTC सदनिकांबाबतची माहिती दर्शनीय भागात सर्व सामान्य लोकांच्या निर्दशनास सहजासहजी येईल, अशा पद्धतीने मराठी भाषेमध्ये फलक लावणेबाबतची खबरदारी घ्यावी तसेच गरज भासल्यास त्यासंदर्भात योग्यती अट योजनेच्या आशयपत्रात नमुद करुन विकासकाकडून बंधपत्र घ्यावे.

(सतीश लोखंडे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

CamScanner